प्रति,

मा. नियंत्रक, वैध मापनशास्त्र,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

दिनांकः 1 सप्टेंबर 2018

विषयः **<u>वजने मापे विक्री परवाना नुतनीकरण अर्जास नामंजुरविरुध्द अपिल करणे बाबत ...</u>**

अर्जदारः मे. अवधुत ट्रेडर्स, प्रो. श्री. वैजनाथ वसंतराव पाठक, मार्केट यार्ड, कवा रोड, लातुर

संदर्भः माझा वजने मापे विक्री परवाना ऑनलाईन नुतनीकरण अर्ज क्र. 124698

महोदय,

उपरोक्त विषयी सविनय अर्ज करतो की, माझा मे. अवधुत ट्रेडर्स या नावाने मार्केट यार्ड, कवा रोड, लातुर येथे वजने मापे विक्रीचा व्यवसाय आहे. सदरच्या परवान्याची वैधता 31 डिसेंबर 2017 रोजी समाप्त झालेनंतर मी परवाना नुतनीकरणासाठी रितसर अर्ज क्र. 124698 अन्वये केला होता.

सदरच्या नुतनीकरणास आवश्यक सर्व कागदपत्रे ऑनलाईन अपलोड केली होती. त्यामध्ये आलेल्या विविध त्रुटींची पुर्तता माझ्या परवान्याचे अन्वेषण अधिकारी मा. निरीक्षक, वैध मापनशास्त्र, औसा विभाग यांचेमार्फत केली होती. मा. सहायक नियंत्रक, वैध मापनशास्त्र, जिल्हा लातुर उस्मानाबाद यांनी माझे वजने मापे विक्री परवाना ऑनलाईन नुतनीकरण अर्ज क्र. 124698 जागेचे नोंदणीकृत भाडेकराराबाबतचे कागदपत्रे सादर करु शकत नसल्यामुळे नुतनीकरण अर्ज नामंजुर केलेला आहे

माझ्या परवान्याच्या जागा ही मे. कृषी उत्पन्न बाजार समिती, लातुर यांचेकडून भाडयाने घेतलेली आहे. सदरच्या ठिकाणी मी 30 वर्षापासुन वजने मापे विक्रीचा व्यवसाय करत आहे व वजने मापे विभागाशी संलग्न आहे. कृषी उत्पन्न बाजार समिती कोणत्याही भाडेकरुस रजिस्टर्ड भाडेकरार करुन देत नाही त्यामुळे मी नोंदणीकृत भाडेकराराबाबत कागदपत्रे सादर करणेस असमर्थ आहे. परंतु, सदरच्या जागेबाबत उपलब्ध इतर सर्व कागदपत्रे मी ऑनलाईन अपलोड केलेली आहेत व या पत्रासोबत जोडुन आपणास सविनय सादर करत आहे.

कृपया, माझ्या उपलब्ध कागदपत्रांना ग्राहय धरुन माझे अपिल अर्ज मंजुर करावा व माझा परवाना नुतनीकरण करण्याबाबत मा. सहायक नियंत्रक, वैध मापनशास्त्र, लातुरजिल्हा यांना आदेशित करावे ही नम्र विनंती. मी आपला आजन्म ऋणी राहील.

आपला विश्वासु

वैजनाथ वसंतराव पाठक
अवधुत ट्रेडर्स, लातुर

सोबतः अपिल अर्ज

<u>अपिल अर्ज</u>

1. अपिलकर्त्याचे नाव व पत्ताः मे. अवधुत ट्रेडर्स, प्रो. श्री. वैजनाथ वसंतराव पाठक, मार्केट यार्ड, कवा रोड, लातुर

2. मा. सहायक नियंत्रक, वैध मापनशास्त्र, जिल्हा लातुर उस्मानाबाद यांनी दिलेला आदेश क्रमांक याविरुध्द अपिल करण्यात येत आहे याचा क्रमांक व दिनांकः मे. अवधुत ट्रेडर्स या वजने मापे विक्री परवान्याचा युझर नेम एमएचडीए 3523 व परवाना नुतनीकरण अर्ज क्रमांक124698 हा ऑनलाईन नामंजुर केलेला आहे. नामंजुर आदेशास कोणताही ऑनलाईन क्रमांक दिसुन येत नाही.

3. अपिलकर्ता सुनावणीसाठी स्वतः उपस्थित राहु इच्छीतो वा प्राधिकृत प्रतिनीधीमार्फत सुनावणी करु इच्छीतो : प्रतिनीधी मार्फत

अपिलाची कारणेः उपरोक्त विषयी सविनय अर्ज करतो की, माझा मे. अवधुत ट्रेडर्स या नावाने मार्केट यार्ड, कवा रोड, लातुर येथे वजने मापे विक्रीचा व्यवसाय आहे. सदरच्या परवान्याची वैधता 31 डिसेंबर 2017 रोजी समाप्त झालेनंतर मी परवाना नुतनीकरणासाठी रितसर अर्ज क्र. 124698 अन्वये केला होता.

सदरच्या नुतनीकरणास आवश्यक सर्व कागदपत्रे ऑनलाईन अपलोड केली होती. त्यामध्ये आलेल्या विविध त्रुटींची पुर्तता माझ्या परवान्याचे अन्वेषण अधिकारी मा. निरीक्षक, वैध मापनशास्त्र, औसा विभाग यांचेमार्फत केली होती. मा. सहायक नियंत्रक, वैध मापनशास्त्र, जिल्हा लातुर उस्मानाबाद यांनी माझे वजने मापे विक्री परवाना ऑनलाईन नुतनीकरण अर्ज क्र. 124698 जागेचे नोंदणीकृत भाडेकराराबाबतचे कागदपत्रे सादर करु शकत नसल्यामुळे नुतनीकरण अर्ज नामंजुर केलेला आहे

माझ्या परवान्याच्या जागा ही मे. कृषी उत्पन्न बाजार समिती, लातुर यांचेकडून भाडयाने घेतलेली आहे. सदरच्या ठिकाणी मी 30 वर्षापासुन वजने मापे विक्रीचा व्यवसाय करत आहे व वजने मापे विभागाशी संलग्न आहे. कृषी उत्पन्न बाजार समिती कोणत्याही भाडेकरुस रजिस्टर्ड भाडेकरार करुन देत नाही त्यामुळे मी नोंदणीकृत भाडेकराराबाबत कागदपत्रे सादर करणेस असमर्थ आहे. परंतु, सदरच्या जागेबाबत उपलब्ध इतर सर्व कागदपत्रे मी ऑनलाईन अपलोड केलेली आहेत व या पत्रासोबत जोडुन आपणास सविनय सादर करत आहे.

ठिकाणः लातुर

दिनांक : 1 सप्टेंबर 2018 अपिलकर्त्याची स्वाक्षरी